MHPA160005812026

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार गजानन बलभीम माने यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३, नुसार त्याचे JCB INDIA LTD. कंपनीची जेसीबी मशीन ज्याचा नोंदणी क्र. MH 23 – AS 2302, ज्याचा CHASSIS NO. RAJ3DXSSE02698543 & ENGINE NO. H00167108 हे वाहन ताब्यात मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, ते जप्त वाहनाचे मालक व ताबेदार आहेत. सदरचे वाहन हे पोलीस ठाणे, पाथरी यांनी गुन्हा नोंद क्र.२४९/२०२४ भा.दं.वि.चे कलम ३७९ सहकलम ३४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ चे कलम ४८(७)(८) मध्ये जप्त केले आहे. अर्जदार हा त्याच्या व्यापाराच्या कामासाठी सदर जेसीबीचा वापर करतो. अर्जदाराची उपजिवीका सदर वाहनावर अवलंबून आहे. सदर वाहन हे पोलीस ठाणे, पाथरी यांनी जप्त केल्यामुळे अर्जदाराला गैरसोय निर्माण झाली आहे. सदर वाहन हे पोलीस ठाणे, पाथरीच्या आवारामध्ये बंद अवस्थेत उभे आहे, त्यामुळे त्यांचे टायर, इंजिन व इतर तांत्रीक भाग खराब होण्याची दाट शक्यता आहे व त्यामुळे अर्जदाराचे अतोनात नुकसान होईल. म्हणून, अर्जदाराने जप्त वाहन त्याच्या ताब्यात देण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, तपासीक अंमलदार व तहसील कार्यालय, पाथरी यांचे म्हणणे मागविण्यात आले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे मांडले की, जप्त जेसीबीचा मशीनचा वापर हा अवैधरित्या वाळूचे उत्खनन करणे कामी मिळून आलेला असल्यामूळे जप्त केलेला आहे. तसेच जप्त वाहन हे सोडून दिल्यास तो त्याच्या स्वरुपात बदल करु शकतो अथवा परत अशाच प्रकारच्या गून्हयात वापर करु शकतो. करिता अर्जदाराचे वाहन सोडण्यात येऊ नये व अर्ज खारीज करण्यात यावा.

०४. तसेच तपासीक अंमलदार यांनी नि.क्र.०६ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, अर्जदार याने रेतीची चोरटी वाहतूक करण्याचा गंभीर गून्हा केला आहे. तसेच सदर गून्हयातील आरोपी हा परजिल्हातील असून तो आवश्यकता असेल त्यावेळी न्यायालयात हजर राहणार नाही. अर्जदार यास जप्त वाहन परत केल्यास तो त्याच्या स्वरुपात बदल करु शकतो. तसेच अशाच प्रकारचा गून्हा परत करण्याची शक्यता नाकारता

येत नाही. करिता अर्जदाराचे जप्त वाहन हे परत करण्यात येऊ नये, अशी विनंती केली.

०५. तसेच तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी या न्यायालयाने पत्र पाठवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे प्रकरणात दाखल केलेले नाही.

०६. अर्जदाराने अर्जाच्या समर्थनार्थ कागदपत्रांची यादी नि.क्र.४ खाली खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत.

1. प्रथम खबरी अहवाल – गुन्हा नोंद क्र.२४९/२०२४ ची प्रत;
2. जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राची पडताळलेली प्रत;
3. वाहनाच्या विम्याची प्रत;
4. अर्जदार याचे पडताळलेले आधारकार्ड प्रत;

०७. अर्ज वाचला व अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद श्रवण केला.

०८. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, गुन्हा नोंद क्र.२४९/२०२४ मध्ये जप्त असलेल्या वाहनाचा अर्जदार हा मालक व ताबेदार असल्याचे दिसून येते. तसेच जप्त वाहनाचा विमा असल्याचे देखील निर्दशनास येते. तसेच सदरचे वाहन हे पोलीस ठाणे, पाथरी यांचे कार्यवाहीत जप्त केलेले आहे. तसेच तहसील कार्यालय, पाथरी यांनी त्यांचे म्हणणे प्रकरणात दाखल केलेले नाही, करिता त्यांचे काहीही एक म्हणणे नाही.

०९. अशा परिस्थीतीत अर्जदार हा जप्त करण्यात आलेला वाहनाचा मालक व ताबेदार असल्याने वाहनाचा अंतरिम ताबा देण्यास कोणताही अडथळा नाही. तसेच सदर जप्त वाहन हे जप्त केल्यापासून पोलीस स्टेशन, पाथरी यांच्या आवारामध्ये एका ठिकाणी उभे आहे. त्यामुळे, जप्त वाहन जर एका ठिकाणी बंद अवस्थेत उभे राहिले तर, वातावरणामध्ये होणा–या बदलामुळे त्याचे टायर, इंजिन व इतर भाग निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक व ताबेदार असल्याने तो जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यास पात्र आहे. सबब,मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात आला.

०२. अर्जदार यांनी रुपये २०,००,०००/- (अक्षरी वीस लाख रुपये फक्त) चा सुपुर्तनामा दाखल करावा.

०३. **पोलीस निरीक्षक / तपासीक अंमलदार, पोलीस ठाणे, पाथरी** यांना निर्देश देण्यात येतो की, गुन्हा नोंद क्र.२४९/२०२४, पोलीस ठाणे, पाथरी या गुन्हयात जप्त करण्यात आलेले JCB INDIA LTD. कंपनीची जेसीबी मशीन ज्याचा नोंदणी क्र. MH 23 – AS 2302, ज्याचा CHASSIS NO. RAJ3DXSSE02698543 & ENGINE NO. H00167108 हे वाहन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात यावे.

अ. अर्जदाराने वरील नमूद वाहनाची कोणत्याही प्रकारे ओळख अथवा मॉडेल मध्ये बदल करु नये.

ब. अर्जदाराने न्यायालयाच्या परवानगी शिवाय सदरची वाहने कोणासही विक्री, बक्षीस अथवा गहाण करु नये किंवा त्यावर कोणताही त्रयस्थ बोजा निर्माण करु नये. तसेच, ज्या ज्या वेळी न्यायालय आदेश करील, त्या त्या वेळी अर्जदाराने सदरची वाहने गुन्ह्या संबंधाने खटला चालू काळात हजर करावे.

०४. तपासीक अंमलदार यांना पूढे असे ही निर्देश देण्यात येतो की, सदरची वाहने अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी त्यांनी सदर वाहनांचा सविस्तर पंचनामा तयार करावा व त्याचे छायाचित्र घ्यावे.

०५. अर्जदार यांनी सुपुर्तनामा दाखल करावा.

**०६. सदर आदेशाचा महूसल कार्यालय, पाथरी यांच्या दंडात्मक, जप्ती कार्यवाहीवर कूठलाही परिणाम होणार नाही.**

०७. येणे प्रमाणे संबंधितांना कळविण्यात यावे.

स्वाक्षरित/-

दिनांकः- ०८.०६.२०२६

**(एम.एस.काझी),**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
**पाथरी जि. परभणी**